**स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्थापनेचा हीरक महोत्सव यांच्या औचित्याने राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये "महापंचायतराज अभियान" राबविणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-२०२१/प्र.क्र.३५/पंरा-१
बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई – ४०० ००१
तारीख २ मे, २०२२.

वाचा –

१) शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०२१/प्र.क्र.३५/पंरा-१, दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१.

२) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-२०२१/प्र.क्र.३५/पंरा-१ दिनांक २९ एप्रिल,२०२२.

**शासन परिपत्रक**

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीस ७५ वर्ष पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून केंद्र शासनाच्या वतीने देशभरात "**आझादी का अमृतमहोत्सव**" अंतर्गत विविध उपक्रम राबविणेत येत आहेत. या धर्तीवर राज्यात ७५ आठवड्यांच्या कालावधीत विविध उपक्रम राबविणेचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच **जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण होत असल्याने हीरक महोत्सव** साजरा करण्यात येत आहे. सदर उपक्रमाचा भाग म्हणून संदर्भीत अनुक्रमांक २ येथील परिपत्रकानुसार राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत हद्दीमध्ये मिळकतीच्या नोंदी पती-पत्नी यांचे संयुक्त नावे करणे, वारसांच्या नोंदी करणे, निवासी स्वरुपाची अतिक्रमणे नियमानुकूल करणे, आपले सरकार सेवा केंद्र (ASSK) च्या रचनेत आणि सेवांमध्ये एकसमानता आणणे, स्वामित्व योजनेच्या माध्यमातून गावठाण मोजणी प्रकल्प राबविणे, ग्रामपंचायत नमुना नं. १ ते ३३ व इतर पूरक अभिलेखे अद्ययावत करणे, १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करावयाची कामे कालबध्दरित्या पूर्ण करणे या सर्व बाबी एकत्रीत स्वरुपात दिनांक १ मे २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत मोहिम स्वरुपात पूर्ण करणेबाबत ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांचेमार्फत **"महापंचायतराज अभियान"** राबविण्यात येत आहे. तथापि, संदर्भीत अ.क्र. २ येथील परिपत्रक याद्वारे रद्द करण्यात येत असून **"महापंचायतराज अभियान"** या अभियाना अंर्तगत पुढील उपक्रम मोहीम स्वरुपात राबविण्यात यावेत.

**१. ग्रामपंचायत हद्दीतील मिळकतींवर वारसांच्या नोंदी करणे :-**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५२ मध्ये ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये गावाच्या गावठाण क्षेत्रात व गावाच्या इतर क्षेत्रात इमारत बांधण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तरतुद समाविष्ट आहे. नगरविकास विभागाकडील अधिसूचनेनुसार, राज्यामध्ये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन

नियमावली (Unified Development Control and Promotion Regulations- UDCPR) मंजुर करण्यात आली आहे. ही नियमावली ग्रामपंचायतींना लागू आहे. सदर नियमावलीनुसार ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील बांधकामे नियोजनबध्दरित्या होण्यास मदत होणार आहे. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील इमारती व मोकळया जागांची नोंद ग्रामपंचायत नमुना नं. ८ मध्ये करण्यात येते. हा नमुना म्हणजे मालकी हक्क शाबीत करणारा अभिलेख नसून कर आकारणीची यादी आहे. तथापि, ग्रामपंचायत स्तरावर नमुना नं. ८ ला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मध्ये इमारती व मोकळया जागांच्या नोंदी करणे, त्यामध्ये फेरफार करणे इ. बाबींचा समावेश आहे. नमुना नं. ८ मध्ये नव्याने नोंदी करण्यासाठी व पूर्वीपासून नोंद असलेल्या मिळकतीच्या हस्तांतरणामुळे मालक अथवा भोगवटादार यांचे फेरफार करण्याची तरतुद पोटनियम १५ मध्ये नमुद आहे. पोटनियम १६-अ मध्ये मालकी हक्क हस्तांतरित झाल्यामुळे नमुना नं. ८ मध्ये करावयाच्या सुधारणाबाबतची तरतुद समाविष्ट आहे. तसेच मालकी हक्क असणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, ज्या व्यक्तीला वापर किंवा अन्यथा त्या मालमत्तेचा मालकी हक्क हस्तांतरित केला आहे किंवा अभिहस्तांकित केला आहे, ती व्यक्ती मृत्यूच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत मृत्यूबाबत आवश्यक पुरावा सादर करेल व त्यानंतर स्थानिक चौकशी करुन पडताळणी केल्यानंतर आणि हरकती मागविण्यासाठी व त्या विचारार्थ स्वीकारण्यासाठी पोटनियम ११ ते १३ मध्ये विहीत केलेली कार्यपध्दती अनुसरुन पंचायतीच्या बैठकीत ठराव मंजुर करुन नमुना नं. ८ मध्ये आवश्यक फेरफार करण्याची तरतुद समाविष्ट आहे.

तथापि, सद्यस्थितीत ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत करांच्या नोंदीबाबत व प्रामुख्याने वारसांच्या नोंदी बाबतचे अर्ज, सूचना व तक्रारी संबंधित व्यक्तीकडून पंचायत समिती, जिल्हा परिषद व शासनस्तरावर वारंवार प्राप्त होत असतात. यावरुन राज्यामध्ये ग्रामपंचायत नमुना नं. ८ मधील वारसाच्या नोंदी मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे वारसांच्या नोंदी करण्यासाठी मोहिम स्वरुपात कार्यपध्दती अवलंबण्याची आवश्यकता विचारात घेवून स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्थापनेचा हीरक महोत्सवाचे औचित्याने राज्यामध्ये सर्व ग्रामपंचायतींमध्ये दिनांक १ मे २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत ग्रामपंचायत नमुना नं. ८ मधील प्रलंबित वारस नोंदी अद्ययावत करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीने करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|
| १) | दिनांक १ मे २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत ग्रामपंचायत नमुना नं. ८ मधील प्रलंबित वारस नोंदी अद्ययावत करण्याची मोहिम हाती घेण्यात येत असल्याबाबत प्रसिध्दी करणे (जाहिर प्रसिध्दी, दवंडी, नोटीस फलक, वृत्तपत्र, स्थानिक केबल वाहिनी, इतर माध्यमाद्वारे) | १ मे २०२२ ते ७ मे २०२२ |

| | | |
|---|---|---|
| २) | प्रलंबित वारस नोंदी करण्यासाठी संबंधितांकडून अर्ज प्राप्त करुन घेणे. | ८ मे २०२२ ते १५ मे २०२२ |
| ३) | प्राप्त अर्जाची छाननी करणे | १६ मे २०२२ ते २५ मे २०२२ |
| ४) | अर्जातील त्रुटी संबंधितांना कळविणे | २६ मे २०२२ ते ३० जून २०२२ |
| ५) | संबंधितांनी त्रुटीची पुर्तता करणे | १ जून २०२२ ते १० जून २०२२ |
| ६) | प्राप्त झालेले अर्जावर पंचायतीच्या सभेमध्ये चर्चा करणे व अर्ज परिपूर्ण असल्याची व तसेच उचित कायदेशीर बाबींची पुर्तता झाली असल्याची खात्री करणे व परिपूर्ण अर्जाबाबत वारस नोंदी करण्यासाठी संबंधितांकडून तीस दिवसांची मुदत देवून हरकती मागविणे. | ११ जून २०२२ ते ३० जून २०२२ |
| ७) | संबंधितांकडून हरकती मागविणे (नियम ११ प्रमाणे कार्यवाही करावी) | १ जुलै २०२२ ते ३१ जुलै २०२२ |
| ८) | नियम १३ नुसार कार्यवाही करुन, प्राप्त झालेल्या हरकतींवर पंचायतीच्या सभेमध्ये चर्चा करुन निर्णय घेणे | १ ऑगस्ट २०२२ ते ९ ऑगस्ट २०२२ |
| ९) | पंचायतीच्या सभेने मान्यता दिली असेल अशा मिळकतीच्या वारसांच्या नोंदीबाबत नमुना नं. ८ मध्ये फेरफार करुन नमुना नं. ८ चा उतारा संबंधित व्यक्तीला वाटप करणे | ११ ऑगस्ट २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ |

## २. ग्रामपंचायत नमुना नं. ८ वरील मिळकतींच्या नोंदी पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे करणे :-

महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी त्यांना पतीच्या मालमत्तेमध्ये हक्क देणे ही मूलभूत गरज आहे. संस्कृतीमध्ये पति-पत्नी यांना एकरूप एक घटक मानला जातो व प्राप्त संपत्ती दोघांची असल्याचे मानले जाते. त्यामुळे स्त्रियांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी त्यांच्या असलेल्या घरांची नोंद पति-पत्नी दोघांच्या नावे असणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा पतीच्या निधनानंतर पतीच्या मालमत्तेमध्ये हक्क प्रस्थापित करताना महिलांना अनेक कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागते. जर आधीच पति-पत्नीचे हक्क ग्रामपंचायतीच्या दप्तरात असेल तर अशा अडचणी येणार नाहीत. यासाठी सुरुवात म्हणून पती आणि पत्नीच्या संयुक्त नावे ग्रामीण भागातील घरांची नोंदणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/२६०३/प्र.क्र.२०६८/पंरा-४ दिनांक २० नोव्हेंबर, २००३ अन्वये सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु तरीही अनेक ग्रामपंचायतींमध्ये सदरहु परिपत्रकानुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आली नसल्याचे दिसून येते.

त्यामुळे राज्यामध्ये ग्रामीण भागातील घरांची नोंदणी पती आणि पत्नीच्या संयुक्त नावे करण्यासाठी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्थापनेचा हीरक महोत्सवाचे औचित्याने कालबध्द कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० चे भाग-२ मध्ये कर आकारणी संदर्भात व कर आकारणी यादीतील (नमुना नं.८) सुधारणा करण्याची कार्यपद्धती विहित केलेली आहे. सदर कार्यपद्धतीला अनुसरून महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील ग्रामपंचायतीनी घरांच्या नोंदी पती व पत्नी यांच्या संयुक्त नावाने करण्याची कार्यवाही करावी. त्यासाठी प्रस्तुत नियमाद्वारे विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे सूचना/हरकती मागवून पंचायतीच्या सभेच्या मान्यतेने ठराव घेऊन सदर नोदी पती पत्नी यांच्या संयुक्त नावाने करण्याबाबत कार्यवाही करावी.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीने करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|
| १) | दिनांक १ मे २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत ग्रामपंचायत नमुना नं. घरांच्या नोंदी पती-पत्नीच्या संयुक्त् नावे करण्याची मोहिम हाती घेण्यात येत असल्याबाबतची प्रसिध्दी करणे (जाहिर प्रसिध्दी, दवंडी, नोटीस फलक, वृत्तपत्र, आकाशवाणी, स्थानिक केबल वाहिनी, इतर माध्यमाद्वारे) | १ मे २०२२ ते ७ मे २०२२ |
| २) | केवळ पतीच्या नावे नोंद असलेल्या मिळकतींची यादी तयार करणे | ८ मे २०२२ ते १५ मे २०२२ |
| ३) | पती-पत्नी दोघांच्या संमतीनुसार संयुक्त नावे नोंद करण्यासाठी अर्ज प्राप्त करुन घेणे | १६ मे २०२२ ते २५ मे २०२२ |
| ४) | प्राप्त झालेले अर्जांवर पंचायतीच्या सभेमध्ये चर्चा करणे व अर्ज परिपूर्ण असल्याची खात्री करणे व परिपूर्ण अर्जाबाबत संबंधितांकडून तीस दिवसांची मुदत देवून हरकती मागविणे. | २६ मे २०२२ ते ५ जून २०२२ |
| ५) | संबंधितांकडून हरकती मागविणे (नियम ११ प्रमाणे कार्यवाही करावी) | ५ जून २०२२ ते ५ जुलै २०२२ |
| ६) | नियम १३ नुसार कार्यवाही करुन, प्राप्त झालेल्या हरकतींवर पंचायतीच्या सभेमध्ये चर्चा करुन निर्णय घेणे | ६ जुलै २०२२ ते ३० जुलै २०२२ |
| ७) | पंचायतीच्या सभेने मान्यता दिली असेल अशा मिळकतीच्या नोंदी पती-पत्नी यांच्या संयुक्त नावाने करुन तसा फेरफार नमुना नं. ८ मध्ये करुन नमुना नं. ८ चा उतारा/अभिलेख संबंधितांना वाटप करणे | १ ऑगस्ट २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ |

### ३) स्वामित्व योजनांतर्गत ड्रोनद्वारे गावठाण मोजणीकामी नमुना नं. ८ मधील माहिती तयार करणे.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/ प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ नुसार, राज्यातील सर्व गावांच्या गावठाणांमधील जमिनींचे GIS आधारित सर्वेक्षण व भूमापन करणेबाबतची योजना ग्राम विकास विभाग, जमाबंदी आयुक्त यांचे कार्यालय व भारतीय सर्वेक्षण विभाग डेहराडून यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. याच धर्तीवर केंद्र शासनाने स्वामित्व योजना सुरु केली असून स्वामित्व योजनेच्या माध्यमातून सर्व गावांचे गावठाण भूमापन करुन मिळकत पत्रिका स्वरुपात अधिकार अभिलेख व गावातील मालमत्तांचे जी.आय.एस.प्रणालीवर आधारित मालमत्ता पत्रक तयार करण्यात येणार आहे. तसेच गावठाणातील मालमत्तांचे GIS आधारित रेखांकन व मुल्यांकन, गावठाणातील प्रत्येक घराचा नकाशा, गावठाणातील प्रत्येक खुल्या जागेचा, रस्त्याचा नकाशा, गावठाणातील प्रत्येक घर, खुली जागा, रस्ता, गल्ली, नाला यांना नगरभुमापन क्रमांक, प्रत्येक मिळकतीची मिळकत पत्रिका, गावातील मालमत्ताकर (नमुना नं.८) व GIS लिंकेज, ग्रामपंचायतीचे व शासनाचे असेट रजिस्टर इत्यादि महत्वपूर्ण बाबी साध्य करता येणार आहेत. या योजनेमुळे शासनाच्या मालकीच्या मिळकतींचे संरक्षण, मिळकतीचा नकाशा, व सीमा निश्चिती, अतिक्रमण रोखणे, घरावर कर्ज घेण्याची सुविधा, मिळकतींना बाजारपेठेत तरलता येऊन गावाची आर्थिक पत उंचावणे,ग्रामपंचायतीला गावातील कर आकारणी, बांधकाम परवानगी, अतिक्रमण निर्मुलन यासाठी अभिलेख व नकाशा उपलब्ध होईल इत्यादि अनेक फायदे होणार आहेत.ही अत्यंत महत्वाकांक्षी योजना असून ठराविक कालमर्यादेत गावठाण मोजणी पूर्ण होण्यासाठी ग्रामपंचायतींकडून करावयाची कार्यवाही कालबध्दरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे. सबब, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्थापनेचा हीरक महोत्सवाचे औचित्याने औचित्याने दिनांक १ मे २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत पुढीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी.

I. सर्व कायदेशीर हस्तांतरणाच्या तसेच वारस नोंदी तात्काळ अद्ययावत करुन घेणे, जेथे एकत्रित कूटूंब मॅनेजर अशी नोंद आहे तेथे नियमाप्रमाणे अद्ययावत वारस नोंदी करुन घेण्यात याव्यात.

II. गावातील गावठाणातील व वाडी वस्त्यांचे सर्व मिळकत धारकांचे भ्रमणध्वनी क्रमांक व पत्ते प्राप्त करून घेणे व भूमिअभिलेख विभागाचे कर्मचारी यांना उपलब्ध करूनं देणे व सर्व मिळकत धारकांचे भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध असल्यास ई-मेल आयडी केंद्र चालकाच्या मदतीने संगणक प्रणालीत अद्यावत करून घेणे.

III. गावांमध्ये राहत नसलेल्या धारकांची यादी तयार करून त्यांचे भ्रमणध्वनी व सध्याचे पत्ते प्राप्त करून त्यांना गावठाण भूमापन बाबत माहिती कळविणे व सदर माहिती भूमापन विभागाकडे द्यावी.

IV. सन २०१०-२०११ नोंदवही चे स्कॅनिंग करून घ्यावे व चालू वर्षातील ग्रामपंचायत नमुना ८ चे संगणकीकरण केंद्र चालकाच्या मदतीने करून घेणे.

V. गावठाण सर्वेक्षण करावयाच्या गावठाणाची सॅटेलाईट इमेज जमाबंदी आयुक्त कार्यालयामार्फत पुरविण्यात येईल, त्या इमेजवर ज्या मिळकती गावठाणा बाहेर आहेत त्यावर ग्रामसेवकांनी ग्रामपंचायत मिळकत क्रमांक लाल शाईने, व ज्या मिळकती गावठाणामध्ये आहेत त्यावर काळया शाईने (Using ०.५ mm Point Pen & Non Washable ink) नमूद करून तो नकाशा दिनांकीत स्वाक्षांकित करून जमाबंदी आयुक्त ठरवून देतील

त्याप्रमाणे हार्ड कॉपी संबंधित तालुक्याचे उप अधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे पोच घेऊन देण्याचा आहे.

VI. सर्व ग्रामपंचायतींकडील नमुना ८ च्या सॉप्ट कॉपी विहित नमुन्यात तयार करुन उपअधीक्षक भुमि अभिलेख यांचे कार्यालयास द्यावी.

VII. वरीलप्रमाणे कार्यवाही याअगोदरच पूर्ण झाली असेल त्यांनी पुन्हा कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. परंतु सर्व ग्रामपंचायतींकडील नमुना नं. ८ च्या सॉप्ट कॉपी विहित नमुन्यात भुमि अभिलेख कार्यालयास दिनांक १५ ऑगस्ट २०२२ पर्यंत सादर करण्याची जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी यांची राहील. जिल्हास्तरावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी वेळोवेळी आढावा घेवून दि.१५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण होईल याची सुनिश्चिती करावी.

**४) १५ वा वित्त आयोग निधी - विकास कामांची अंमलबजावणी.**

१५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून राज्यातील पंचायत राज संस्थांना मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त होत आहे. निधीचा विनियोग करण्यापूर्वी गावाच्या गरजा विचारात घेवून लोकसहभागातून व ग्रामसभेच्या मान्यतेने राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतींचा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यात येतो. त्या प्रमाणात निधीदेखील ग्रामपंचायतींना उपलब्ध होतो. आराखड्यानुसार कामांची अंमलबजावणी वेळच्या वेळी व्हावी अशी नागरीकांची अपेक्षा असते. परंतु यापूर्वीचा १४ व्या वित्त आयोग व सध्याचा १५ वा वित्त आयोगाच्या निधीच्या अंमलबजावणीचे विश्लेषण केले असता, पुरेसा निधी उपलब्ध असून देखील आराखड्यातील कामांची अंमलबजावणी करण्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर कालापव्यय होत असल्याचे दिसून येते. तसेच वर्षाच्या सुरुवातीला निधी उपलब्ध असतानासुध्दा आर्थिक वर्षाच्या शेवटच्या ३ ते ४ महिन्यामध्ये कामे उरकण्याकडे ग्रामपंचायतींचा कल दिसतो. वर्षा अखेर करावयाची प्रशासकीय कामे, योजनांचे प्रस्ताव सादर करणे, कर वसुली इ. कार्यबाहुल्यामुळे आराखड्यातील कामे घाईगडबडीने केल्यास कामांच्या गुणवत्तेवरदेखील परिणाम होऊ शकतो. सद्यस्थितीत ग्रामपंचायत स्तरावर सन २०२१-२२ साठी अबंधित निधीचा संपूर्ण हिस्सा व बंधित निधीचा पहिला हप्ता ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच त्यापूर्वीच्या वर्षातील बराचसा निधीही अखर्चित आहे. सबब, उपलब्ध निधीतून ग्रामपंचायतींनी दिनांक १५ ऑगस्ट २०२२ पूर्वी कामे सुरु करावीत यासाठी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्थापनेचा हीरक महोत्सवाचे औचित्याने दिनांक १ मे २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर पुढीलप्रमाणे कालबध्दरित्या कार्यवाही पूर्ण करावी.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीने करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) मधील निधी उपलब्ध असेल अशा कामांना ग्रामपंचायतीच्या सभेची प्रशासकिय मान्यता देणे. (नोडल अधिकारी – विस्तार अधिकारी पंचायत) | १ मे २०२२ ते ३१ मे २०२२ |
| २) | सदर कामांचे अंदाजपत्रक मागणी व तांत्रिक मान्यता मिळणेकामी पंचायत समितीचे बांधकाम/ग्रामीण पाणीपुरवठा/ लघुपाटबंधारे विभाग यांचेकडे प्रकल्प अहवालासह प्रस्ताव सादर करणे. (नोडल अधिकारी - विस्तार अधिकारी पंचायत) | १ जून २०२२ ते ५ जून २०२२ |

| | | |
|---|---|---|
| ३) | सक्षम तांत्रिक अधिकारी यांनी ग्रामपंचायतींना अंदाजपत्रक (तांत्रिक मंजुरीसह) उपलब्ध करुन देणे (नोडल अधिकारी उपअभियंता) | ६ जून २०२२ ते ६ जुलै २०२२ |
| ४) | ई ग्रामस्वराज पोर्टलवर आवश्यक नोंदी घेणे, विकास कामाच्या तांत्रिक मंजुरी रक्कमेनुसार नियमोचित कार्यपध्दती (दरपत्रके/ जाहीर निविदा/ ई निविदा) नुसार कार्यवाही करणे. कार्यवाही पूर्ण झालेनंतर पंचायतीच्या मंजुरीने संबंधितांस कार्यारंभ आदेश देणे व कामे प्रत्यक्षात सुरु करणे.<br>(नोडल अधिकारी-गट विकास अधिकारी) | ७ जुलै २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ |

वरील कार्यपध्दती बांधकामविषयक कामांसाठी दिली आहे. वस्तू व सेवा खरेदीची कामे आराखड्यात समाविष्ट असल्यास प्रचलित नियमानुसार खरेदीची प्रक्रिया सुरु करुन १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत पुरवठा आदेश निर्गमित होतील यासाठी आवश्यक ते नियोजन करावे. उपरोक्त कालबध्द कार्यक्रम मार्गदर्शक स्वरुपातील असून प्रत्यक्ष कामे करताना संबंधित कायद्याच्या व नियमाप्रमाणे अपेक्षित असलेला कालावधी विचारात घेता कमी अथवा जास्त कालावधी लागू शकतो. परंतु १५ ऑगस्ट २०२२ पर्यंत कामांना कार्यारंभ आदेश देऊन कामे सुरु होतील अशारितीने नियोजन करावे.

**५) ग्रामपंचायत नमुना नंबर १ ते ३३ व अनुषंगिक अभिलेखे अद्ययावत करणे :-**

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता, २०११ नुसार ग्रामपंचायतीचे नमुना नंबर १ ते ३३ अभिलेखे व इतर पूरक अभिलेखे अद्ययावत ठेवणे ही ग्रामपंचायतींची वैधानिक जबाबदारी आहे. मात्र बऱ्याचदा हे अभिलेखे विलंबाने पूर्ण करण्यात येतात किंवा अपूर्ण ठेवण्यात येतात. परिणामी ग्रामपंचायतीच्या कामावर याचा विपरीत परिणाम होऊन तक्रारींमध्येदेखील वाढ होताना निदर्शनास येत आहे. तसेच हे अभिलेखे पूर्ण नसल्याने केंद्र शासनाच्या ई-ग्रामस्वराज व अन्य आज्ञावली तसेच ई ग्रामसॉप्ट प्रणाली अपूर्ण रहात असल्याचे दिसून येते. यास्तव दिनांक १ मे २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये नमुना नंबर १ ते ३३ व अनुषंगिक अभिलेखे अद्ययावत करणेबाबतची मोहिम हाती घेण्यात यावी. यासोबतच केंद्र व राज्य शासनाच्या सर्व आज्ञावली अद्ययावत करणेची कार्यवाही ग्रामपंचायतींनी पूर्ण करावी.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | जबाबदारी | कालावधी |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता २०११ नुसार नमुना नं.१ ते ३३ व इतर पूरक नमुने अद्ययावत करणे. मासिक सभा/ ग्रामसभा/ महिला सभा/वॉर्ड सभा रेकॉर्ड अद्ययावत करणे, केंद्र व राज्य शासनाच्या सर्व आज्ञावली (सॉप्टवेअर्स) अद्ययावत करणे. | ग्राम विकास अधिकारी/ ग्रामसेवक | १ मे २०२२ ते १५ जून २०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | अ.क्र. १ प्रमाणे ग्रामपंचायतींनी कार्यवाही पूर्ण केलेबाबत अधिनस्त सर्व ग्रामपंचायतींची पडताळणी/तपासणी करुन तसे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी यांचेकडे सादर करणे | विस्तार अधिकारी (पंचायत) | १६ जून २०२२ ते १५ जुलै २०२२ |
| ३) | अ.क्र. १ प्रमाणे ग्रामपंचायतींनी कार्यवाही पूर्ण केलेबाबत तालुक्यातील किमान १० ग्रामपंचायतींची पडताळणी/ तपासणी करुन तसे प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करणे | गट विकास अधिकारी /सहाय्यक गट विकास अधिकारी | १६ जुलै २०२२ ते ३१ जुलै २०२२ |
| ४) | अ.क्र. १ प्रमाणे ग्रामपंचायतींनी कार्यवाही पूर्ण केलेबाबत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील किमान दोन ग्रामपंचायतींची पडताळणी/ तपासणी करणे व यासाठी इतर अधिकाऱ्यांची मदत घेणे. तसेच याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) | १ ऑगस्ट २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ |

**६) आपले सरकार सेवा केंद्र (ASSK) च्या रचनेत आणि सेवांमध्ये एकसमानता आणणे :-**

राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमधील सर्व नागरिकांना समान डिजिटल सेवा देण्यासाठी ग्रामपंचायतीअंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन (ASSK) करण्यात आलेले आहे. ASSK केंद्रामध्ये अपुऱ्या सोयी, नागरीकांना बैठक व्यवस्था नसणे, अनेक केंद्रांमध्ये केंद्र चालकांची पूर्णवेळ उपस्थिती नसणे, अशा बाबी विषयी लोकांच्या तक्रारी येत आहेत. तसेच आपले सरकार केंद्रांच्या सेवा आणि कार्यालयीन रचनेमध्ये एक समानता दिसून येत नसल्याने राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक राग्रास्वअ/१३४/२०२१-२२ दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजीचे पत्रान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विशिष्ट कालमर्यादेमध्ये कार्यवाही पूर्ण करुन आपले सरकार सेवा केंद्र अधिकाधिक आकर्षक व नागरिकस्नेही होण्याच्या दृष्टीने आणि स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्थापनेचा हीरक महोत्सवाचे औचित्याने औचित्याने खालीलप्रमाणे कार्यवाही १ मे २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत पूर्ण करावी.

१) **नामफलक** :- आपले सरकार सेवा (ASSK) केंद्रामध्ये नामफलक व दरसूची दर्शनी भागात लावणे. फलक हा शक्यतोवर ३x२ फुट किया ४X२ फुट (आडवा व उभा) आकारमानाचा व फोमशीट अथवा ॲक्रेलिक शीटमध्ये असावा (दिनांक १९ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयातील रंगसंगतीचा फलक नमुना राज्य व्यवस्थापन कक्षकडील दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजीचे पत्रासोबत जोडल्याप्रमाणे असावा.)

२) **दरसुची** :- आपले सरकार सेवा (ASSK) केंद्रामध्ये दरसूची दर्शनी भागात लावणे. दरसूचीचा फलक फोमशीट अथवा ॲक्रेलिक शीटमध्येच असावा व त्याचे आकारमान शक्यतोवर २x४ फुट (आडवा व उभा) असावे. तसेच सदरच्या दरफलकाचा रंग नेव्ही ब्लु किंवा मरून रंगाच्या फलकावर पांढरी अक्षरे याप्रमाणे असावा.

३) **ASSK केंद्राचे ठिकाण** :- आपले सरकार सेवा केंद्र शक्यतोवर ग्रामपंचायतीच्या बाहेरील /दर्शनी बाजूस असावे. जेणेकरून तेथील गर्दीचा ग्रामपंचायतीच्या कामावर परिणाम होणार नाही. तसेच नागरिकांनाही सहजपणे दाखले/उतारे व सेवा प्राप्त करून घेणे सोईचे होईल. केंद्र एक खिड़की पद्धतीने चालविणेत यावे.

४) **ASSK केंद्रासाठी सुविधा** :- आपले सरकार सेवा केंद्रासाठी स्वतंत्र खोली असावी. ते शक्य नसल्यास केंद्रासाठी स्वतंत्र केबिन बनविणेत यावी. केंद्रामध्ये स्वतंत्र संगणक (पुरेशा व योग्य त्या मापदंडाचे), अद्ययावत संगणक प्रणाली, प्रिंटर, स्कैनर,इंटरनेट, नियमित वीज पुरवठा, बॅटरी बॅकअप अथवा यू.पी.एस., आवश्यक फर्निचर व इतर पूरक सोयी सुविधा उपलब्ध करणे.

५) **नागरीकांसाठी सुविधा** :- आपले सरकार सेवा केंद्रामध्ये सेवा घ्यायला येणाऱ्या नागरिकांसाठी पुरेशी बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी व इतर किमान आवश्यक सुविधा पुरविणेसाठी व्यवस्था निर्माण करणे.

६) **केंद्र चालक उपस्थितीचे वार** :- आपले सरकार सेवा केंद्र क्लस्टर स्वरूपात (एका पेक्षा अधिक ग्रामपंचायतींसाठी) असल्यास प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये केंद्र चालकाच्या उपस्थितीचे वार दर्शविणारा फलक लावणे.

**७) ग्रामीण भागातील शासकिय जमिनीवर निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणे**

सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकिय जमिनीवर निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१० दिनांक १६ फेब्रुवारी २०१८ नुसार निर्णय घेण्यात आला आहे. शासन परिपत्रक क्रमांक प्रआयो-२०१८/प्र.क्र.२५६/योजना-१० दिनांक २० ऑगस्ट, २०१८ नुसार याबाबतीत संगणक प्रणाली विकसित करुन त्याद्वारे अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे व त्याआधारे ग्रामपंचायत स्तरावर अतिक्रमणांच्या नोंदी अंतिम मुदतीत म्हणजेच दिनांक १५ मार्च, २०२१ पर्यंत संगणक प्रणालीमध्ये करण्यात आलेल्या आहेत. त्यातील दिनांक १.१.२०११ पूर्वीची विहित निकषानुसार पात्र असणारी निवासी अतिक्रमणे ठराविक कालमर्यादेमध्ये नियमानुकूल करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी तसेच जे लाभार्थी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्य पुरस्कृत योजना अंतर्गत पात्र आहेत त्यांची अतिक्रमणे प्राधान्याने नियमानुकूल करण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्थापनेचा हीरक महोत्सवाचे औचित्याने औचित्याने कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीने करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|
| १) | संगणक प्रणालीवर अतिक्रमण धारकांची दि. १५.०३.२०२१ पर्यंत झालेल्या डेटा एन्ट्रीची ग्रामसेवक विस्तार अधिकारी/गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या लॉगीन मधून सर्व नोदी प्रमाणित करण्यात याव्यात. | १ मे २०२२ ते १० मे २०२२ |
| २) | ग्रामपंचायतींनी संगणक प्रणालीमधून अतिक्रमण धारकांची यादी उपलब्ध करून ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात लावून व ग्रामपंचायतींसबंधी वेबसाईटवर अपलोड करून सूचना व आक्षेप मागविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी द्यावी, | ११ मे २०२२ |
| ३) | यादीवर आक्षेप/हरकती व सूचना नोंदविण्यासाठी १५ दिवसांची मुदत असेल ज्यांना आक्षेप/हरकती व सूचना नोंदवायच्या असतील त्यांनी पूर्वीप्रमाणे "परिशिष्ट ब" मध्ये नोंदविण्यात याव्यात | १२ मे २०२२ ते २६ मे २०२२ |
| ४) | यादी प्रसिध्दीच्या कालावधीत ग्रामसेवकांनी दि. ०१.०१.२०११ पूर्वीच्या अतिक्रमण धारकांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी (Spot Verification) करुन अहवाल "परिशिष्ट क मध्ये तयार करावा. स्थळ पाहणीकरिता मोबाईल ॲप उपलब्ध करुन देण्यात आले आहे. ग्रामसेवक लॉगीन मध्ये दि. ०१.०१.२०११ पूर्वीच्या अतिक्रमण धारकांची माहिती व फोटो अपलोड करावयाचा आहे. वरीलप्रमाणे सर्व अतिक्रमणधारकांची स्थळ पाहणी दि. १५.०७.२०२१ पर्यंत पूर्ण करावी. | १२ मे २०२२ ते २६ मे २०२२ |
| ५) | ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांनी सदर "परिशिष्ट ब" मधील प्राप्त आक्षेप/हरकती व सूचनाची पडताळणी करावी व त्यावर स्वाक्षरी करून त्याची एक प्रत संगणक प्रणालीवर नोंद घेण्याकरिता केंद्र चालकाकडे द्यावी. | २७ मे २०२२ ते ३१ मे २०२२ |
| ६) | केंद्र चालकाने वरील परिशिष्ट ब प्रमाणे आक्षेप/हरकती व सूचनांची नोंद संगणक प्रणालीवर घ्यावी व ग्रामसेवक आणि गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या लॉगिन मधून सदर नोंदी प्रमाणित कराव्यात, | १ जून २०२२ ते १० जून २०२२ |
| ६) | **उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर संगणक प्रणालीद्वारे खालीलप्रमाणे याद्या (List) तयार होतील**<br>अ. **List A**- दिनांक ०१.०१.२०११ पूर्वीची अतिक्रमणे ज्यांच्याबाबत सूचना व आक्षेप नाहीत. तसेच स्थळ पाहणी अहवालानुसार संगणक प्रणालीमध्ये नोंद केलेल्या माहितीशी सुसंगत आहेत अशा अतिक्रमणधारकांची यादी.<br>ब. **List B**- दि. ०१.०१.२०११ पूर्वीची अतिक्रमणे जी स्थळ | ११ जून २०२२ ते २० जून २०२२ |

| | | |
|---|---|---|
| | पाहणीकरिता प्रलंबित आहेत त्याची यादी.<br>क. **List C**- दिनांक ०१.०१.२०११ पूर्वीची अतिक्रमणे जी स्थळ पाहणी अहवालानुसार अतिक्रमणाची संगणक प्रणालीमधील माहितीशी सुसंगत नाहीत,<br>ङ. **List D**- दिनांक ०१.०१.२०११ पूर्वीची अतिक्रमणे ज्याच्या बाबतीत स्थळ पाहणी अहवालानुसार प्रत्यक्ष जागेवर मिळकत / अतिक्रमण आढळून आलेले नाही.<br>इ. **List E**- दिनांक ०१.०१.२०१५ नंतरच्या अतिक्रमण धारकांची यादी.<br>फ. **List F**- ज्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात एकाही अतिक्रमणाची नोंद संगणक प्रणाली नाही.<br>वरीलप्रमाणे List A ते E ग्रामसभेमध्ये ठेऊन त्यातील प्रत्येक अतिक्रमणधारकाच्या नोंदीबाबत ग्रामसभेने निर्णय घ्यावा. याकरिता ग्रामसभांचे आयोजन करणे. | |
| ७) | List A मध्ये ज्या जागेवर अतिक्रमण नियमानुकूल करण्यास ग्रामसभेची मान्यता आहे, त्या ठरावाची नोंद संगणक प्रणालीवर करावी. ठरावाची अतिक्रमणनिहाय नोंद झाल्यानंतर शासकीय विभागनिहाय यादी संगणक प्रणालीद्वारे प्राप्त होईल. **यापैकी गावठाणातील अतिक्रमणाची यादी** महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, कलम ५५ नुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अंतिम मान्यतेसाठी संगणक प्रणालीतून गट विकास अधिकारी यांचेकडे पाठविणे | २० जून २०२२ ते २२ जून २०२२ |
| ८) | गट विकास अधिकारी यांनी त्यांचे लॉग इनमध्ये प्राप्त झालेल्या अतिक्रमणांच्या नोंदीबाबत छाननी करुन निकषांनुसार पात्र नोंदी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेकडे संगणक प्रणालीद्वारे पाठविणे. | २३ जून २०२२ ते २५ जून २०२२ |
| ९) | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांनी लॉग इनमध्ये प्राप्त झालेल्या अतिक्रमणांच्या नोंदीबाबत छाननी करुन निकषांनुसार पात्र नोंदी संगणक प्रणालीद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविणे. | २६ जून २०२२ ते ३० जून २०२२ |
| १०) | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता देताना शासन निर्णय दि. १३.०८.२०१९ अन्वये कळविलेनुसार सदर जमिनीची केंद्र शासन/ राज्यशासन /इतर शासकीय/निमशासकीय व अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडून सार्वजनिक प्रकल्पाकरिता मागणी प्राप्त झालेली नाही याची खातरजमा करणे व अंतिम मान्यता देणे. | १ जुलै २०२२ ते १० जुलै २०२२ |

| | | |
|---|---|---|
| ११) | List A मध्ये ज्या अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्यात ग्रामसभा विरोध दर्शवेल किंवा त्यामध्ये काही बदल सुचवेल अशा नावांची यादी, व List B ते List D ग्रामसभेच्या ठरावासह शक्ती प्रदत्त समितीकडे पाठविणे. | ११ जुलै २०२२ ते १५ जुलै २०२२ |
| १२) | List E पैकी जर काही अतिक्रमणे दि. ०१.०१.२०११ पूर्वीचे असल्याची ग्रामसभेची खात्री झाल्यास सदर अतिक्रमण धारकांची यादी तयार करावी, अशी अतिक्रमणधारकांची यादी पुढील निर्णयास्तव शक्ती प्रदत्त समितीकडे पाठविणे. सदर अतिक्रमणधारकांबाबत शक्ती प्रदत्त समितीच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणे. | ११ जुलै २०२२ ते १५ जुलै २०२२ |
| १३) | **गावठाणाबाहेरील अतिक्रमणांच्या नोंदीबाबत** - List A मध्ये ज्या जागेवर अतिक्रमण नियमानुकूल करण्यास ग्रामसभेची मान्यता आहे, त्या ठरावाची अतिक्रमणनिहाय नोंद संगणक प्रणालीवर ग्रामपंचायत स्तरावर झाल्यानंतर शासकीय विभागनिहाय यादी संगणक प्रणालीद्वारे प्राप्त होईल. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांनी गावठाणाबाहेरील अतिक्रमणे (गायरान जमिन, वनक्षेत्र व वास्तव्यास योग्य नसलेली जमिन वगळून) Accept केल्यानंतर त्यांची जमिन प्रकारानुसार यादी काढण्याची सुविधा संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध आहे. त्याप्रमाणे यादी काढून संबंधित विभागास देणे. | २० जून २०२२ ते ३० जून २०२२ |
| १४) | संबंधित विभागांकडून अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत प्राप्त झालेले प्रस्ताव एकत्रित करुन विभागनिहाय प्रस्ताव दि. ०९.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये गठीत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीसमोर सादर करणे. | |
| १५) | जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती विभागनिहाय प्राप्त प्रस्तावांवर चर्चा करुन विभागाचे अभिप्राय विचारात घेवून व शासनाच्या धोरणानुसार व त्यामागच्या तर्क व भुमिका विचारात घेवून अतिक्रमण नियमानुकूल करण्यास मान्यता प्रदान करेल. | १६ जुलै २०२२ ते २५ जुलै २०२२ |
| १६) | उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाचा ठराव संगणक प्रणालीवर "Land Type wise Resolution Upload" या टॅब मधून अपलोड करावा. ठराव अपलोड केल्यानंतर सदर ठरावातील निर्णयाप्रमाणे अतिक्रमण निहाय "Other than Gavthan Encroachment wise Mapping" या टॅब मधून मॅपिंग करण्यात यावा. मॅपिंग करतांना प्रत्येक झालेला निर्णय "Accept" अथवा "Reject" करण्याचा पर्याय उपलब्ध | २६ जुलै २०२२ ते ३० जुलै २०२२ |

| | | |
|---|---|---|
| | करून देण्यात आलेला आहे. तसेच मॅपिंग करताना अतिक्रमणनिहाय स्वाक्षरीत निर्णयाची PDF प्रत अपलोड करावयाची आहे तसेच मॅपिंग करताना जर जिल्हा समितीने अतिक्रमण क्षेत्रफळ कमी करण्याचा निर्णय घेतला असल्यास त्याप्रमाणे अतिक्रमण क्षेत्रफळ कमी करण्याची सुविधा संगणकप्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. | |
| १७) | उपरोक्त प्रमाणे मॅपिंग केल्यानंतर Accept केलेली सर्व अतिक्रमणे थेट ग्रामसेवक लॉगीनमध्ये जातील **निशुल्क मंजूरीस पात्र असलेले** अतिक्रमणाचे आदेश व प्रमाणपत्र ग्रामसेवक लॉगीन मधून डाऊनलोड करता येतील. **तर सशुल्क अतिक्रमणाबाबत** शासन पत्र दि.१५.०३.२०२२ मधील कार्यपध्दती अनुसरुन अतिक्रमण नियमानुकूल शुल्क रक्कम भरल्यानंतर ग्राम सेवक लॉग इनमध्ये आदेश व प्रमाणपत्र संगणक प्रणालीवर तयार होतील. | १ ऑगस्ट २०२२ ते १० ऑगस्ट २०२२ |
| १८) | List A मधील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाल्यावर जी अतिक्रमणे निःशुल्क नियमानुकूल करण्यास पात्र आहेत त्यांचे आदेश संगणक प्रणालीद्वारे तयार होतील व ग्रामसेवक लॉगीनमध्ये ते प्राप्त होतील, तसेच ज्या अतिक्रमणाबाबत अतिक्रमण नियमानुकूल शुल्क भरावे लागणार आहे त्याबाबत शासन पत्र दि. ११.०१.२०२१ व दि.१५.०३.२०२२ प्रमाणे अतिक्रमणे शुल्क शासन जमा केल्यानंतर अतिक्रमण आदेश ग्रामसेवक लॉगीनमध्ये प्राप्त होतील. निशुल्क व सशुल्क भरणा केल्यानंतर अतिक्रमण नियमानुकूल केलेबाबतचे **आदेश व प्रमाणपत्र संबंधित अतिक्रमण धारकांना वितरीत करणे**. | ११ ऑगस्ट २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ |

**अहवाल सादरीकरण :-**

**प्रपत्र-१. :- ग्रामपंचायत हददीतील मिळकतींच्या नोंदी वारस नोंदी करणे**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | एकूण ग्रामपंचायत संख्या | अभियान कालावधीत वारस नोंदीसाठी आलेले अर्ज संख्या | पैकी नमुना नं. ८ मध्ये केलेल्या वारस नोंदी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |

**प्रपत्र-२ :- ग्रामपंचायत नमुना नं. ८ वरील मिळकतींच्या नोंदी पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे करणे :-**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | एकूण ग्रामपंचायत संख्या | नमुना नं. ८ नुसार एकूण मिळकतींची संख्या | अभियान कालावधीनंतर पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे केलेल्या नोंदींची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |

**प्रपत्र-३ - स्वामित्व योजनांतर्गत ड्रोनद्वारे गावठाण मोजणीकामी नमुना नं. ८ मधील माहिती तयार करणे.**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण ग्रामपंचायत संख्या | यापूर्वी नगर भुमापन (सिटी सर्व्हे) झालेल्या ग्रा.पं.संख्या | यापूर्वी नगर भुमापन (सिटी सर्व्हे) न झालेल्या ग्रा.पं.संख्या | ग्रामपंचायत नमुना नं. ८ विहित नमुन्यात तयार केलेल्या ग्रा.पं.संख्या | नमुना नं. ८ विहित नमुन्यात तयार करुन भुमि अभिलेख कार्यालयास सादर केलेल्या ग्रा.पं.संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |

**प्रपत्र-४ - १५ वा वित्त आयोग निधी २०२१-२२- विकास कामांची अंमलबजावणी..**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण ग्रामपंचायत संख्या | १५ वा वित्त आयोग निधी आराखडयात समाविष्ट कामे संख्या | | १५ ऑगस्ट २०२२ रोजी प्रत्यक्ष सुरु झालेल्या कामांची संख्या संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बंधित | अबंधित | बंधित | अबंधित |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |

**प्रपत्र – ५ - ग्रामपंचायत नमुना नंबर १ ते ३३ व इतर पूरक अभिलेखे अद्ययावत करणे**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण ग्रामपंचायत संख्या | नमुना नं. १ ते ३३ अद्ययावत केलेल्या ग्रामपंचायतींची संख्या | ई ग्रामस्वराज, ई ग्रामसॉप्ट व इतर आज्ञावली अद्ययावत केलेल्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

**प्रपत्र-६:- आपले सरकार सेवा केंद्र (ASSK) च्या रचनेत आणि सेवांमध्ये एकसमानता आणणे :-**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण ग्राम पंचायत संख्या | ASSK नामफलक लावलेल्या ग्रा.पं.संख्या | ASSK दरसुची लावलेल्या ग्रा.पं. संख्या | ASSK सोयी-सुविधा पुरविलेल्या ग्रा.पं. संख्या | नागरीकांसाठी सुविधा केलेल्या ग्रा.पं. संख्या | KC भेटीचे वार फलक लावलेल्या ग्रा.पं. संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |

**प्रपत्र-७:-ग्रामीण भागातील शासकिय जमिनीवर निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणे**

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | एकूण ग्राम पंचायत संख्या | संगणक प्रणालीमध्ये असणाऱ्या १.१.२०११ पूर्वीच्या अतिक्रमणांची संख्या | | अभियान काळात नियमानुकूल केलेल्या अतिक्रमणांची संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गावठाणा मधील | गावठाणा व्यतिरिक्त | गावठाणा मधील | गावठाणा व्यतिरिक्त |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |

**"महापंचायतराज अभियान"** कालावधीत वरीलप्रमाणे प्रपत्रांतील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांना सादर करावा व उपायुक्त (विकास) यांनी विभागीय आयुक्त यांचे स्वाक्षरीने विभागाचा अहवाल दिनांक ३० ऑगस्ट २०२२ पर्यंत शासनास सादर करावा.

**संनियंत्रण**:-

**"महापंचायतराज अभियान"** ची अंमलबजावणी विहित कालमर्यादेमध्ये पूर्ण व्हावी याबाबतचे संनियंत्रण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर संबंधित विस्तार अधिकारी (पंचायत), तालुकास्तरावर गट विकास अधिकारी, जिल्हास्तरावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) व विभागीय स्तरावर उपायुक्त (विकास) यांनी संनियंत्रण करावयाचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी अभियानात करावयाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. वरीलप्रमाणे कार्यवाही कालमर्यादेमध्ये पूर्ण होण्यासाठी केंद्र चालकांना तांत्रिक मार्गदर्शन करण्याची जबाबदारी तालुका व्यवस्थापक (ASSK) व जिल्हा व्यवस्थापक (ASSK) यांचेवर राहील.

**वरील सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.**

Kumar

**(राजेश कुमार)**

**अतिरिक्त मुख्य सचिव,ग्रामविकास विभाग**

**प्रति :-मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ...(सर्व)**

प्रत :-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव सविनय सादर
२. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव
३. जिल्हाधिकारी...(सर्व)
४. संचालक, राज्य गृहनिर्माण कक्ष (ग्रामीण), सी.बी.डी.बेलापूर नवी मुंबई
५. राज्य प्रकल्प संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे
६. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

७. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
८. नोडल अधिकारी (स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद (सर्व)
९. प्रकल्प सल्लागार, सी.एस.सी. एस.पी.व्ही.कंपनी.